**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ७**

दिनांक :- १६/०९/२०१३ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची **मासिक सभा** सोमवार दिनांक १६/०९/२०१३ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ५. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ६. | मा. लोंढे गणेश नारायण | सदस्य |
| ७. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ८. | मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ९. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| १०. | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| ११. | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| १२ | मा. गावडे जयश्री वसंत | सदस्य |
| १३. | मा. शेट्टी प्रसाद | सदस्य |
| १४. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| १५. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | सदस्य |
| १६. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १७. | मा. मंचरकर गिता सुशिल | सदस्य |
| १८. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १९. | मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव | सदस्य |

२०. मा. आसवानी सविता धनराज सदस्य

२१. मा. ओव्हाळ शेखर अशोक सदस्य

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी सुभाष माछरे, मा. कार्य. अभियंता रविंद्र दुधेकर, शरद जाधव, वसंत काची, प्रशासन अधिकारी शांताराम राऊत, लेखाधिकारी सुरेश आव्हाळे, उपअभियंता, बागलाणे संजय, डी. एन. गट्टूवार, सी.बी. कोंडे, के. डी. फुटाणे, व्हि. जी कांबळे, व्ही.एन.देसले, सुधाकर कुदळे, श्रीम. मोमीन, एम.एम.चव्हाण, उद्यान सहा. आर.बी. चांदेरे सहा. आरोग्याधिकारी, जे.एस. जानकर, इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेचे कामकाजास सुरुवात झाली

**उपस्थित सन्मा सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय**

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. १ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

बॅडमिंटन कोर्ट चालू करणे बाबत.

मोरवाडी प्रभाग क्र २७ मध्ये बोरा कन्स्ट्रक्शनचे आवारात मनपाने जी इमारत बांधली आहे. त्या इमारतीमध्ये बॅडमिंटन कोर्ट सुर करणेत यावे.

विषय क्र. २ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सध्या असलेल्या हॉलपेक्षा मोठा हॉल निर्माण करणेबाबत

प्रेमलोक पार्क येथील कै. मनिषा भाऊसाहेब भोईर विरंगुळा केंद्र या ठिकाणी गेली वर्षभर मोठया प्रमाणावर विविध सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत. पण यासाठी विरंगुळा केंद्राची जागा अपुरी पडत असल्याने या ठिकाणी होणा-या कार्यक्रमात मोठया प्रमाणावर समस्या निर्माण होत आहेत. तरी सध्या असलेल्या हॉल पेक्षा मोठा हॉल निर्माण करावा व नागरिकांना सहकार्य करावे.

विषय क्र. ३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

विद्युत मंडळाने लावलेला उद्योगनगर ब्रम्हगिरी इमारती समोरील हायमास्ट त्या ठिकाणाहून उद्योगनगर मधील महापालिकेच्या व्यायाम शाळेसमोर त्याची खरी गरज आहे. कारण सध्या तो ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी मुबलक प्रमाणात प्रकाशाची सोय आहे. पण व्यायाम शाळे समोर श्री.दत्त मदिर असल्याने रोज सायंकाळी त्या ठिकाणी वृध्द व बालकांची मोठया प्रमाणात वर्दळ असल्याने त्या ठिकाणी पुरेसा प्रकाश नसल्याने भाविकांची गैरसोय होत आहे व परिसरात महिलांचा संध्याकाळी वावर असल्यामुळे व सदर शहरात घडलेल्या गुन्हेगारी घटनाचा विचार करुन त्वरीत दत्त मंदिरासमोर हायमास्ट स्थलांतरीत करण्यात यावा.

विषय क्र. ४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

उद्योगनगर दळवीनगर झोपडपट्टीमधील पेव्हींग ब्लॉकचा गेली तीन ते चार महिन्यांपासून प्रश्न निर्माण झालेला असताना महापालिकेच्या झोपडपट्टी स्थापत्य विभागाशी सतत पत्रव्यवहार करुन देखील सदर कामाबद्दल

महापालिकेकडून  कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नाही. तरी पावसाळी वातावरण असून साथीच्या रोगांचा प्रसार पाहता लवकरात लवकर पेव्हींग ब्लॉक बसवून द्यावेत.

विषय क्र. ५ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनीमध्ये स.नं.७७ व स.नं. ७९ हा भाग बेघरासाठी घर (H.D.H.) देण्यात येणार असल्याचे सदर नकाशामध्ये (सिटी सर्व्हे) नमुद करणेत आलेले आहे. परंतु सदर आरक्षण मनपाने ताब्यात घेणेत यावी. सदर विषय कायम होणेची वाट न पाहता कारवाई करणेस विनंती.

विषय क्र. ६ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

उद्योगनगर मधील महापालिकेची व्यायामशाळा गेली कित्येक वर्षापासून जुन्या साहित्याने व कमी जागेने त्रस्त झालेली आहे. तरी मोठया प्रमाणावर विद्यार्थी असल्याने या ठिकाणी अपु-या जागेमुळे व कमी साहित्यामुळे यांचे नुकसान होत आहे व विविध समस्या निर्माण होत आहेत. प्रभागाचा विचार करता व्यायाम करणा-या लोकांची संख्या मोठया प्रमाणात आहे. परंतू सदर व्यायाम शाळा अपु-या जागेमुळे व कमी साहित्यामुळे नागरिकांना निरउपयोगी ठरत आहे. तरी सदर व्यायाम शाळेची जागा वाढवून नविन साहित्य लवकरात लवकर दाखल करावे.

विषय क्र. ७ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरी चिंचवड मनपा विकास आराखडयातील ४५.०० मी. रुंदीचा काळेवाडी फाटा ते देहू आळंदी हा बी आर टी एस रस्ता विकसित करीत आहे. या रस्ता रुंदीकरणात विकास आराखडयातील आरक्षण मोकळी जागा क्र. १० येथे मनपाचे कै. नारायण दगडू कापसे रोपवाटिका केंद्र आहे. सदरचे रोपवाटिका केंद्र रस्ता रुंदीकरणात बाधित होत असल्याने ते पाडून टाकणे आवश्यक आहे. सदरचे रोपवाटिका केंद्र हे लोडबेअरींग असून छतास पत्रा आहे. व त्याचे क्षेत्रफळ सुमारे ४१५ चौ. फुट आहे. या ठिकाणी मनपाने विकास आराखडयानुसार यापुर्वीच रोपवाटिका केंद्राच्या बाहेर नव्याने सिमाभिंत ही बांधलेली आहे. सदर रोपवाटिका केंद्र पाडण्यात यावे.

विषय क्र. ८ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभग क्र. २८ मासुळकर कॉलनीमधील आरक्षण क्र. १०९, ११० हे मनपाच्या ताब्यात नाहीत. तरी सदर आरक्षणे ताब्यात घेणे. सदर विषय कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेस मान्यता मिळावी.

विषय क्र. ९ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

मनपाने मासुळकर कॉलनी येथे हेगडेवार क्रिडा संकुल बांधलेले असुन तेथे स्केटींगचे ग्राऊंड आहे. तसेच जीम व मैदान असल्याने मुले स्केटींग ग्राऊंडवर क्रिकेट, फुटबॉल खेळतात. त्यामुळे स्केटींग ग्राऊंडचे नुकसान होत आहे तेथील नागरिकांच्या मागणीनुसार स्केटींग ग्राऊंडला कव्हर्ड करणेस विनंती आहे.

विषय क्र. १० विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

चिंचवड उपविभागात होणा-या विविध कार्यक्रमासाठी तात्पुरती ध्वनिक्षेपन, प्रकाश व जनरेटरची व्यवस्था करणे.

विषय क्र. ११ विभाग : विद्युत विभाग, ब प्रभाग

ब प्रभागात होणा-या विविध कार्यक्रमासाठी तात्पुरती ध्वनीक्षेपन, प्रकाश व जनरेटरची व्यवस्था करणे.

विषय क्र. १२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २३ केशवनगरमध्ये मोरया गोसावी क्रिडांगणाच्या प्रवेश व्दारावर महान साधु मोरया गोसावी यांचा पुतळा बसविण्यास मान्यता मिळावी जेणेकरुन त्या क्रिडांगणाला जे नांव देण्यात आले आहे. त्या महान साधुंचे त्या ठिकाणी दर्शन व्हावे.

विषय क्र. १३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

चिंचवड गांव भाजी मंडई येथे भाजी मंडईचा बोर्ड नसल्याने नागरिकांना त्याबाबत माहित होत नाही तरी या ठिकाणी NEON SIGN BOARD बसविण्यात यावा.

विषय क्र. १४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरीनगर येथील लाल बहाद्दूर शास्त्री मार्केटमध्ये इमारतीच्या वर NEON SIGN BOARD बसविण्यात यावा.

विषय क्र. १५ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरी नगर येथील लाल बहाद्दूर शास्त्री मार्केटमध्ये दररोज ५० ते ६० हजार लोकांची ये-जा असल्या कारणाने येणा-या ग्राहकांचे पैसे, पाकीट, मंगळसूत्रे, सोन्याची चैन लुटले जातात. त्यामुळे या परिसरातील नागरिक त्रस्त झालेले आहेत. तसेच अशा गर्दीच्या ठिकाणी घातपात होण्याची शक्यता पाहता पिंपरी भाजी मंडई परिसरामध्ये C.C.T.V. बसविण्यात यावे.

विषय क्र. १६ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २३, केशवनगर या प्रभागामध्ये तालेरा हॉस्पीटलकडे जाणा-या रस्त्यावर असणा-या गल्यांना गल्ली क्र.१, गल्ली क्र.२, अशी नांवे देऊन दर्शक फलक लावण्यात यावे.

तालेरा हॉस्पिटल रोड गल्ली क्र१, व तालेरा हॉस्पिटल रोड गल्ली क्र२ असे दर्शक फलक लावण्यात यावेत

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक - मा. शेट्टी प्रसाद अनुमोदक - मा. को-हाळे अनंत सुभाष

सन्मा. नगरसदस्यांनी सांगितलेली अतिक्रमण (हातगाडया / टप-या इ.) विषयक, पाणी पुरवठा बाबत, साफ सफाईची कामे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना वेळोवेळी दूरध्वनीवरुन तसेच समक्ष सांगूनही प्रभागातील कामे होत नाहीत. याचा निषेध करुन आजची सभा तहकुब करण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

मा. अध्यक्षा - बुधवार दि. २५/९/२०१३ रोजी स. १२.०० वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे

सही/-

[ पवार यमुनाताई रमणनाना ]

अध्यक्ष

ब प्रभाग समिती, चिंचवड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**( दि. १६/०९/२०१३ ची तहकूब सभा )**

**कार्यपत्रिका क्र. ७**

दिनांक :- २५/०९/२०१३ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची **दि. १९/०९/२०१३ ची तहकूब सभा** बुधवार दिनांक २५/०९/२०१३ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ५. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ६. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ७. | मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ८. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| ९. | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| १०. | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| ११. | मा. शेट्टी प्रसाद | सदस्य |
| १२. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| १३. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १४. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी सुभाष माछरे, मा. कार्य. अभियंता रविंद्र दुधेकर, शरद जाधव, वसंत काची, (नगरसचिव)-लेखाधिकारी सुरेश आव्हाळे, उपअभियंता, बागलाणे संजय, डी. एन. गट्टूवार, सी.बी. कोंडे, के. डी. फुटाणे, व्हि. जी कांबळे, व्ही.एन.देसले, सुधाकर कुदळे, श्रीम. मोमीन, एम.एम.चव्हाण, उद्यान सहा. आर.बी. चांदेरे सहा. आरोग्याधिकारी, जे.एस. जानकर, इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली

दि. २१/८/२०१३ व १६/९/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यत्रिका ६ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्र. ४९ विषय क्र. १

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. साळुंके सविता सुरेश अनुमोदक: मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन

संदर्भ : मा. साळुंके सविता सुरेश यांचे दि. १६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

मोरवाडी प्रभाग क्र २७ मध्ये बोरा कन्स्ट्रक्शनचे आवारात मनपाने जी इमारत बांधली आहे. त्या इमारतीमध्ये बॅडमिंटन कोर्ट सुर करणेस मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ५० विषय क्र. २

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. लोंढे गणेश नारायण अनुमोदक: मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख

संदर्भ : मा. लोंढे गणेश नारायण यांचे दि. ६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

सध्या असलेल्या हॉलपेक्षा मोठा हॉल निर्माण करणेबाबत

प्रेमलोक पार्क येथील कै. मनिषा भाऊसाहेब भोईर विरंगुळा केंद्र या ठिकाणी गेली वर्षभर मोठया प्रमाणावर विविध सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत. पण यासाठी विरंगुळा केंद्राची जागा अपुरी पडत असल्याने या ठिकाणी होणा-या कार्यक्रमात मोठया प्रमाणावर समस्या निर्माण होत आहेत. तरी सध्या असलेल्या हॉल पेक्षा मोठा हॉल करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ५१ विषय क्र. ३

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. लोंढे गणेश नारायण अनुमोदक: मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख

संदर्भ : मा. लोंढे गणेश नारायण यांचे दि. ६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

विद्युत मंडळाने लावलेला उद्योगनगर ब्रम्हगिरी इमारती समोरील हायमास्ट त्या ठिकाणाहून उद्योगनगर मधील महापालिकेच्या व्यायाम शाळेसमोर त्याची खरी गरज आहे. कारण सध्या तो ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी मुबलक प्रमाणात प्रकाशाची सोय आहे. पण व्यायाम शाळेसमोर श्री.दत्त मदिर असल्याने रोज सायंकाळी त्या

ठिकाणी वृध्द व बालकांची मोठया प्रमाणात वर्दळ असल्याने त्या ठिकाणी पुरेसा प्रकाश नसल्याने भाविकांची गैरसोय होत आहे व परिसरात महिलांचा संध्याकाळी वावर असल्यामुळे व सदर शहरात घडलेल्या गुन्हेगारी घटनाचा विचार करुन त्वरीत दत्त मंदिरासमोर हायमास्ट स्थलांतरीत करण्यात यावा.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ५२ विषय क्र. ४

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. लोंढे गणेश नारायण अनुमोदक: मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख

संदर्भ : मा. लोंढे गणेश नारायण यांचे दि. ६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

उद्योगनगर दळवीनगर झोपडपट्टीमधील पेव्हींग ब्लॉक चा गेली तीन ते चार महिन्यांपासून प्रश्न निर्माण झालेला असताना महापालिकेच्या झोपडपट्टी स्थापत्य विभागाशी सतत पत्रव्यवहार करुन देखील सदर कामाबद्दल महापालिकेकडून कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नाही. तरी पावसाळी वातावरण असून साथीच्या रोगांचा प्रसार पाहता लवकरात लवकर पेव्हींग ब्लॉक बसविणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ५३ विषय क्र. ५

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन अनुमोदक : मा. साळुंके सविता सुरेश

संदर्भ : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांचे दि.१६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनीमध्ये स.नं.७७ व स.नं. ७९ हा भाग बेघरासाठी घर (H.D.H.) देण्यात येणार असल्याचे सदर नकाशामध्ये (सिटी सर्व्हे) नमुद करणेत आलेले आहे. परंतु सदर आरक्षण मनपाने ताब्यात घेणेत यावी. सदर विषय कायम होणेची वाट न पाहता कारवाई करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ५४ विषय क्र. ६

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. लोंढे गणेश नारायण अनुमोदक: मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख

संदर्भ : मा. लोंढे गणेश नारायण यांचे दि. ६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

उद्योगनगर मधील महापालिकेची व्यायामशाळा गेली कित्येक वर्षापासून जुन्या साहित्याने व कमी जागेने त्रस्त झालेली आहे. तरी मोठया प्रमाणावर विद्यार्थी असल्याने या ठिकाणी अपु-या जागेमुळे व कमी साहित्यामुळे यांचे नुकसान होत आहे व विविध समस्या निर्माण होत आहेत. प्रभागाचा विचार करता व्यायाम करणा-या लोकांची संख्या मोठया प्रमाणात आहे तथापि व्यायाम शाळा अपु-या जागेमुळे व कमी साहित्यामुळे नागरिकांना निरुउपयोगी ठरत आहे. तरी सदर व्यायाम शाळेची जागा वाढवून नविन साहित्य लवकरात लवकर दाखल करणेस मान्यता मिळावी.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ५५ विषय क्र. ७

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन अनुमोदक: मा. साळुंके सविता सुरेश

संदर्भ : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांचे दि.१६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड मनपा विकास आराखडयातील ४५.०० मी. रुंदीचा काळेवाडी फाटा ते देहू आळंदी हा बी आर टी एस रस्ता विकसित करीत आहे. या रस्ता रुंदीकरणात विकास आराखडयातील आरक्षण मोकळी जागा क्र. १० येथे मनपाचे कै. नारायण दगडू कापसे रोपवाटिका केंद्र आहे. सदरचे रोपवाटिका केंद्र रस्ता रुंदीकरणात बाधित होत असल्याने ते पाडून टाकणे आवश्यक आहे. सदरचे रोपवाटिका केंद्र हे लोडबेअरींग असून छतास पत्रा आहे. व त्याचे क्षेत्रफळ सुमारे ४१५ चौ. फुट आहे. या ठिकाणी मनपाने विकास आराखडयानुसार यापुर्वीच रोपवाटिका केंद्राच्या बाहेर नव्याने सिमाभिंत ही बांधलेली आहे. सदरचे रोपवाटिका केंद्र पाडणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ५६ विषय क्र. ८

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन अनुमोदक: मा. साळुंके सविता सुरेश

संदर्भ : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांचे दि.१६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरीचिंचवड महानगरपालिकेच्या प्रभग क्र. २८ मासुळकर कॉलनीमधील आरक्षण क्र. १०९ व ११० ही मनपाच्या ताब्यात नाहीत. तरी सदर आरक्षणे ताब्यात घेणे. सदर विषय कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ५७ विषय क्र. ९

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन अनुमोदक: मा. साळुंके सविता सुरेश

संदर्भ : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांचे दि.१६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाने मासुळकर कॉलनी येथे हेगडेवार क्रिडा संकुल बांधलेले असुन तेथे स्केटींगचे ग्राऊंड आहे. तसेच जीम व मैदान असल्याने मुले स्केटींग ग्राऊंडवर क्रिकेट, फुटबॉल खेळतात. त्यामुळे स्केटींग ग्राऊंडचे नुकसान होत आहे तेथील नागरिकांच्या मागणीनुसार स्केटींग ग्राऊंडला कव्हर्ड करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ५८ विषय क्र. १०

दि. २५/०९/२०१३ विभाग :विद्युत विभाग, ब प्रभाग

सुचक : मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव अनुमोदक: मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
संदर्भ : क्र. बप्र/वि/३/कावि/७३/२०१३, दि.२३/०८/२०१३ रोजीचे पत्र.

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

चिंचवड उपविभागात होणा-या विविध कार्यक्रमासाठी तात्पुरती ध्वनिक्षेपन, प्रकाश व जनरेटरची व्यवस्था करणे करणेस र.रु. १०,००,०००/- अक्षरी रक्कम रुपये दहा लाख फक्त चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ५९ विषय क्र. ११

दि. २५/०९/२०१३ विभाग :विद्युत विभाग, ब प्रभाग

सुचक : मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव अनुमोदक: मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
संदर्भ : क्र. बप्र/वि/३/कावि/७४/२०१३, दि.२३/०८/२०१३ रोजीचे पत्र.

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

ब प्रभागात होणा-या विविध कार्यक्रमासाठी तात्पुरती ध्वनिक्षेपन, प्रकाश व जनरेटरची व्यवस्था करणेस र.रु. १०,००,०००/- अक्षरी रक्कम रुपये दहा लाख फक्त चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ६० विषय क्र. १२

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक : मा. शेट्टी प्रसाद

संदर्भ : मा. को-हाळे अनंत सुभाष यांचे दि.१६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र. २३ केशवनगरमध्ये मोरया गोसावी क्रिडांगणाच्या प्रवेश व्दारावर महान साधु मोरया गोसावी यांचा पुतळा बसविण्यास मान्यता मिळावी जेणेकरुन त्या क्रिडांगणाला जे नांव देण्यात आले आहे. त्या महान साधुंचे त्या ठिकाणी दर्शन व्हावे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ६१ विषय क्र. १३

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन अनुमोदक : मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव
संदर्भ : मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन यांचे दि.१६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

चिंचवड गांव भाजी मंडई येथे भाजी मंडईचा बोर्ड नसल्याने नागरिकांना त्याबाबत माहित होत नाही तरी या ठिकाणी NEON SIGN BOARD बसविणेस मान्यता दिली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ६२ विषय क्र. १४

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव अनुमोदक मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
संदर्भ : मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव यांचे दि.१६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरीनगर येथील लाल बहाद्दूर शास्त्री मार्केटमध्ये इमारतीच्या वर NEON SIGN BOARD बसविणेस मान्यता दिली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ६३ विषय क्र. १५

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव अनुमोदक मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
संदर्भ : मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव यांचे दि.१६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

पिंपरी नगर येथील लाल बहाद्दूर शास्त्री मार्केटमध्ये दररोज ५० ते ६० हजार लोकांची ये-जा असल्या कारणाने येणा-या ग्राहकांचे पैसे, पाकीट, मंगळसूत्रे, सोन्याची चैन लुटले जातात. त्यामुळे या परिसरातील नागरिक त्रस्त झालेले आहेत. तसेच अशा गर्दीच्या ठिकाणी घातपात होण्याची शक्यता पाहता पिंपरी भाजी मंडई परिसरामध्ये C.C.T.V. बसविण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ६४ विषय क्र. १६

दि. २५/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक : मा. शेट्टी प्रसाद

संदर्भ : मा. को-हाळे अनंत सुभाष यांचे दि.१६/०९/२०१३ रोजीचे पत्र.

प्रभाग क्र. २३, केशवनगर या प्रभागामध्ये तालेरा हॉस्पीटलकडे जाणा-या रस्त्यावर असणा-या गल्यांना गल्ली क्र.१, गल्ली क्र.२, अशी नांवे देऊन दर्षक फलक लावण्यात यावे.

तालेरा हॉस्पिटल रोड गल्ली क्र१, व तालेरा हॉस्पिटल रोड गल्ली क्र२ असे दर्षक फलक लावण्यात यावेत

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्षा मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-

[ पवार यमुनाताई रमणनाना ]
अध्यक्षा
ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रति,

सर्व संबंधित

प्रशासन अधिकारी
सभाशाखा, ब प्रभाग समिती
पि.चिं.मनपा, चिंचवड-३३.

क्र. एएमसी/बप्र२/कावि/२८३/२०१३, दि. ३/१०/२०१३.